# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/११(२०१९-२०)/ 192 दिनांक : १९.१०.२०१९

**आदेश केस क्र.११(२०१९-२०)**

प्रति,

| | |
|---|---|
| मे. अनय फर्टीलायझर्स, प्रो.रमेश प्रेमराज मर्दा<br>सि.स.क्र.६२८ कचरा डेपो सांगली नाका<br>इचलकरंजी ता. हातकणंगले जि. कोल्हापूर | अर्जदार |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभाग इचलकरंजी | विरुध्द पक्षकार |

कोरमः- १.श्रीमती पुष्पा सु. तावडे, अध्यक्ष
२.श्री. राजेंद्र ल.हजारे, सदस्य सचिव,
३. श्री. प्रशांत श. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**संक्षिप्त गा-हाणे**

१. थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार ग्राहकाचे नमूद केलेल्या पत्त्यावर लघु दाब औद्योगिक (LT-VB-II) वीज जोडणी असून त्याचा ग्राहक क्र. २५०६५३४४६३३७ असाआहे. तक्रारदारांनी आपला आवश्यक तो तपशील आपल्या तक्रार अर्जाच्या परिशिष्ट 'अ' मध्ये दिलेला आहे.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदारांनी इचलकरंजी नगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कचा-यापासून खत निर्मितीसाठी महावितरण कंपनीकडे नवीन वीज कनेक्शनसाठी अर्ज सादर केला. महावितरण कंपनीने सांगितले नुसार स्वखर्चाने पण NDDF Scheme खाली केला. महावितरण कंपनीने सांगितलेनुसार स्वःखर्चाने पण NDDF Scheme खाली नविन रोहित्र व केबल टाकणेचे काम केले व वीज बिलातून बिलाच्या ५०% प्रमाणे वजावट देण्याचे ठरले. त्यानुसार सदर वीज जोडणीसाठी NDDF Scheme/1022/16-17 या क्रमांकाने दिनांक १६.०८.२०१६ रोजी अंदाजपत्रकास व १०५ अश्वशक्ती विद्युत भारास दि. १६.०८.२०१६ रोजी मंजूरी मिळाली.तसेच ग्राहक क्र. २५०६५३४४६३३७ हा आहे.

सदर मंजूर जोडणी मिळालेनंतर पहिले वीज देयक दि. २२.०१.२०१७ ते २१.०२.२०१७ या कालावधीचे आले. यामध्ये ५०% वजावट मिळाली. दिनांक २१.०२.२०१७ ते ०१.०३.२०१७ कालावधीच्या बिलापासून यापुढे दि. ३१.०३.२०१८ चे बिलातून व त्यानंतर दि. ३१.०१.२०१८ ते २८.०२.२०१८ या कालावधीच्या बिला पर्यन्त ५०% वजावट मिळत होती. दि. २८.०२.२०१८ बिलातून अचानक वजावट बंद केलेचे दिसून आले. महावितरणच्या कार्यालयामध्ये चौकशी केली असता सदर NDDF Scheme Reverification साठी वरीष्ठ कार्यालयाकडे पाठविलेचे सांगितले, व पुढील निर्णय येईपर्यन्त पूर्ण बिले काढण्यात येतील तसेच ती भरावी लागतील असे सांगण्यात आले. वीज देयक भरणेसाठी विलंब झालेस दंड व व्याज लागू नये यासाठी दि. २८.०२.२०१८ नंतरची देयके Under protest भरत असलेबाबत दि. १३.०४.२०१८ रोजी पत्र देवून वीज देयक भरत आलो. यांनतर सदर योजनेबाबत महावितवरण कंपनीकडे वेळोवेळी चौकशी केली असता वरीष्ठ कार्यालयाकडून निर्णय आला नसलेचे सांगण्यात आले. तसेच या पत्रामध्ये NDDF Schme मधील मंजूर रक्कम ५,७३,८८९/- इतकी असून आतापर्यन्त रु. ८५,०१७/- इतकी वजावट बिलातून मिळालेली असून रु. ४,८८,८७२/- इतकी रक्कम प्रलंबित आहे. वजावट बंद झालेल्या देयकापासून( दि. २८.०२.२०१८ ते ३१.०३.२०१८) आज अखेर भरलेली देयके व या पुढील बिलातून ठरलेप्रमाणे ५०% वजावट NDDF Scheme खाली ग्राहकाने मिळावी अशी विनंती केली.

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, कोल्हापूर यांच्याकडे परिशिष्ट 'क्ष' मध्ये दि. २५.०२.२०१९ रोजी "आता पर्यन्त मी जी जादा रक्कम रु. ६२,६५५/- दिनांक ३१.१२.२०१८ ते दि. ३१.०१.२०१९ या कालावधीच्या वीज देयकापर्यन्त भरलेली आहे ती व्याजासह परत मिळावी व पूर्ववत NDDF Scheme चा लाभ मिळावा. जर योजना पुढे चालू ठेवणार नसाल तर पूर्ण शिल्लक रक्कम रु. ४,८८,८७२/- इतकी व्याजासह एक रक्कमी परत मिळावी व मानसिक त्रासाबद्दल रु. १०,०००/- भरपाई म्हणून मिळावी." असा अर्ज केला. या अर्जावर दि. १२.०३.२०१९ रोजी सुनावणी होऊन दि. २८.०३.२०१९ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

"मुख्य कार्यालयाचे परिपत्रक क्र. CE(DIST)/D-III/NONDDF STOPPAGE / 009245 दि. २३.०४.२०१९ नुसार NDDF परतावा परिमंडल कार्यालयाकडून १५ दिवसामध्ये परीक्षण करुन घेण्यात यावा व तद्नंतर पुढील बिलामधून परतावा देण्यात यावा."

सदर आदेशाचे पालन झाले नसलेने तसेच वरील आदेश संदिग्ध असलेने आमचे मागणीनुसासर आम्हास परतावा अथवा पूर्ण रक्कम मिळावी अशी मागणी केलेली आहे.

## वितरण कंपनीची भूमिका

मंचाने त्यांच्या पत्र क्र. EE/KOPZ/CGRF/Case No.११/२०१९-२०/८५ दिनांक २४.०४.२०१९ च्या पत्राने तक्रारदाराचया दि. २२.०४.२०१९ च्या तक्रार अर्जा संदर्भात महाराष्ट राज्य वीज नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ च्या विनियम क्र. ६.१३ नुसार या तक्रार अर्जानुसार महावितरणचे म्हणणे आवश्यक त्या कागदपत्रासहित हे पत्र मिळाल्यापासून १० दिवसांचे आत मंचाकडे सादर करण्यास सांगितले महावितरणने अतिरिक्त कार्यकारी अभियंता 'अ' उपविभाग इचलकरंजी यांचे मार्फत यांचे जावक क्र. अ.का.अ/अ उपवि/बिलींग क्र.१४७३ दिनांक ३०.०४.२०१९ च्या पत्राने त्यांचे स्पष्टीकरण या मंचास सादर केले, ते खालील प्रमाणे आहे.

तक्रारदार औद्योगिक ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक २५०६५३४४६३३७ असा आहे. NDDF/CC&RF या योजने अंतर्गत अंदाजपत्रक क्र. १०२२ /१६-१७ नुसार रु. ६,३८,७००/- इतके रक्कमेचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले होते.सदरचे काम ग्राहकाने पूर्ण केलेनंतर कार्यकारी अभियंता , इचलकरंजी यांनी त्यांचे पत्र दिनांक २०.१२.२०१६ व DDF CCF&RF WCR नुसार रु. ५,७३,८८९/- इतक्या रक्कमेचा परतावा देणेबाबत विभागीय कार्यालयाने कळविले. त्यानुसार सदर रक्कमेपैकी ग्राहकांस त्यांचे ग्राहक क्र. २५०६५३४४६३३७ च्या मार्च-२०१७ ते मार्च-२०१८ या कालावधीतील विज बिलामधून रु. ८५,०१७/- इतक्या रक्कमेचा परतावा देणेत आलेला आहे. यानंतर मुख्य कार्यालय मुंबई यांचे परिपत्रक क्र. CE/(Dist)/D-III/Non-DDF/CCF&RF/5489 दिनांक १४.०३.२०१८ नुसार वीज देयकातून एप्रिल २०१८ पासून परतावा देणेचे थांबवणेत आले. तसेच सदर परिपत्रकानुसार NDDF ग्राहकांची माहिती मंजूरीसाठी विहित नमुन्यात दि. २८.०५.२०१९ रोजी विभागीय कार्यालय, इचलकरंजी या वरीष्ठ कार्यालयास कळविली .परंतु यानंतर DDF CCF&RF या योजनेतील उर्वरीत रक्कम परतावा देणेबाबतची मंजूरी अद्यापी प्राप्त न झालेने पुढील परतावा देणेत आलेला नाही.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, मंडल कार्यालय कोल्हापूर यांचेकडे DDF CCF &RF योजने मधील उर्वरित रक्कम परतावा मिळणे बाबत तक्रार सादर केली. सदर कक्षाने दि. २८.०३.२०१९ च्या आदेशाद्वारे परिमंडल कार्यालयाकडून १५ दिवसामध्ये परीक्षण करुन घेण्यात यावा व तदनंतर पुढील बिलातून परतावा देण्यात यावा असा आदेश दिला. सदर आदेशानुसार सदरचा प्रस्ताव योग्य ती कागदपत्रे जोडून विभागीय कार्यालय इचलकरंजी यांचेकडे अग्रेषित करणेत आले. तसेच विभागीय कार्यालय इचलकरंजी यांचेकडून लेखापरीक्षण करुन दि. २९.०४.२०१९ रोजी अधिक्षक अभियंता, कोल्हापूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत आलेला आहे. CE/(Dist)/D-III/Non-DDF/CCF&RF/5489 दिनांक १४.०३.२०१८ नुसार प्रस्ताव मंजूरीचे अधिकार हे मुख्य अभियंता कोल्हापूर यांना असलेने त्यांच्याकडून मंजूरी प्राप्त होताच उर्वरीत रक्कमेचा ग्राहकास परतावा देण्यात येईल.

## सुनावणी व त्या दरम्यानचा युक्तिवाद

या प्रकरणाची सुनावणी दि. २१.०९.२०१९ रोजी या मंचासमोर घेण्यात आली. त्यावेळी तक्रारदार श्री रमेश मर्दा आणि वि.प. कंपनीतर्फे श्री प्रशांत ढेरे उपकार्यकारी अभियंता व श्री अशोक कबाडे,सहाय्यक अभियंता हे हजर होते. त्यांचे तोंडी युक्तिवाद ऐकणेत आले. उपलब्ध सर्व कागदपत्रे वाचण्यात आली.

सुनावणी दरम्यान तक्रारदारांनी लिखित अभिवेदनात दिलेल्या व तक्रार अर्जाचा नमुना 'अ' मध्ये नमूद केलेल्या मुद्दयांचे अनुषंगाने आपले निवेदन केले. दिनांक २२.०४.२०१९ च्या तक्रारीनुसार NDDF ची शिल्लक रक्कम रु. ४,८८,८७२/- इतकी आहे . त्यामधून जुलै-२०१९ च्या विलामधून रु. ९७१/- वजा झाले असून आता NDDF ची शिल्लक रक्कम रक्कम रु. ४,८७,९०१/- इतकी आहे. तसेच सदोष मिटरमुळे जादा भरलेल्या रक्कमेचा परतावा जुलै-२०१९ च्या बिलानुसार रु. ४३,१३०/- इतका आहे. NDDF व जादा भरलेल्या रक्कमेचा परतावा परत मिळावा. दोन्ही मिळून एकुण रु. ५,३१,०३१/- इतकी रक्कम होते, असे तक्रारदाराने स्पष्ट केले.

महावितरणचे परिपत्रक क्र. ०३१९ दिनांक २८.०६.२०१९ याकडे लक्ष वेधून या प्रमाणे १२ महिन्याची सरासरी बिल रक्कम शिल्लक ठेवून उर्वरित रक्कम संबंधित ग्राहकाच्या खातेस वर्ग करावी.असे सादर केले. यानुसार ऑगस्ट २०१८ ते जुलै-२०१९ चे एकूण बिल रु. १,२७,८३७/- इतके आहे. यामधून सदोष मिटरमुळे जादा भरलेली रक्कम रु. ४५,०८७/- वजा जाता रु. ८२,७५०/- रक्कम राखून ठेवून ती पुढील १२ महिन्यामध्ये बिलातून कमी करणेत यावी व उर्वरीत रक्कम रु. ४,४८,२८१/- आमचे बॅक खातेत लवकरात लवकर जमा करावी. अशी मंचास विनंती केली.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLH... ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

याच वेळेस विज वितरण कंपनीने महावितरणचे परिपत्रक क्र.३१९ दिनांक २८.०६.२०१९ हे परिपत्रक " Policy for refund of tariff difference amount to consumer through RTGS/NEFT in their Bank account insted of adjusting the refund amount in their electricity bill." या विषयाशी संबंधीत असलेलेमुळे सदर परिपत्रक तक्रारदाराच्या NDDF Refund या मागणीसाठी लागू होत नाही असे निवेदन केले.

यानंतर कंपनी प्रतिनिधीने 'अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्या आदेशानुसार मुख्य अभियंता , कोल्हापूर यांची मंजूरी घेऊन NDDF ची ५०% रक्कम बिलातून परतावा देणेची सुरुवात जुलै-२०१९ पासून केली आहे. यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांच्या आदेशाचे पालन केलेले आहे, असे मंचापुढे सादर केले.

तक्रारदाराच्या मागणीनुसार एप्रिल २०१८ ते जून २०१९ या कालावधीमध्ये NDDF परतावा मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या आदेशानुसार थांबवणेत आला होता. या कालावधीमधील रक्कम वरीष्ठ कार्यालयाची मंजूरी घेऊन वीज देयकातून लवकरच क्रेडीट देणेत येत आहे. यामुळे अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर व मंचाकडे सादर केलेल्या तक्रारीचे निराकरण महावितरण करत असल्याचे मंचापुढे मांडले.

तसेच तक्रारदाराच्या मागणी नुसारच १०५ अश्वशक्ती वीज कनेक्शन दि. २२.१२.२०१६ रोजी जोडून देण्यात आले आहे. यासाठी रोहित्र व केबल टाकणेची पायाभूत सुविधा NDDF योजनेमध्ये तक्रारदाराने स्वःखर्चाने करण्याची व प्रत्येक महिन्याच्या बिलातून ५०% परतावा मिळण्यासही लिखित मान्यता दिली. १०५ अश्वशक्ती जोड भारानुसार वीज वापर झाला असता तर निश्चितच ५०% प्रमाणे परताव्याची रक्कम २ वर्षामध्ये तक्रारदारास मिळाली असती . परतु तक्रारदारांनी डिसेंबर २०१८ मध्ये १०५ अश्वशक्ती वरुन १९ अश्वशक्ती इतका वीज भार कमी करुन मिळावा म्हणून अर्ज दिला व त्यानुसार दि. १५.१२.२०१८ रोजी मंजूरी दिली. प्रथमच १९ अश्वशक्ती वीज भाराची मागणी केली असती तर इतकी पायाभूत सुविधा उभी करावी लागली नसती. महावितरणच्या उपलब्ध नेटवर्क मधून १९ अश्वशक्तीचे कनेक्शन जोडूनही देता आले असते. यामुळे नव्यानेच सादर केलेली संपूर्ण NDDF रक्कम परत मिळावी ही मागणी ग्राहय धरु नये. त्याचप्रमाणे ना दुरुस्त मिटरचा परतावा मिळणेबाबतची तक्रार ही मुळ तक्रार अर्जाशी निगडीत नसलेने ती मान्य करु नये, असे मंचापुढे निवेदन केले.

## <u>मंचाच्या विचारार्थ मुद्दे</u>

मूळ तक्रार अर्ज सादर पत्रव्यवहार , उभयपक्षाने सुनावणी दरम्यान केलेल्या युक्तीवाद उपलब्ध पत्र व दस्तऐवज यांचा एकत्र विचार करता मंचासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराच्या मागण्या मंजूर होण्यास पात्र आहेत काय? | अंशतः |
| २ | अंतिम आदेश | खालील प्रमाणे |

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

## कारणमिमांसा

तक्रारदार अनय फर्टिलायझर्स (प्रोपा श्री रमेश प्रेंमराज मर्दा) यांचे नांवे २५०६५३४४६३३७ हे औद्योगिक कनेक्शन आहे. त्यांना दि. २२.१२.२०१६ रोजी १०५ अश्वशक्तीचे वीज जोडणी देण्यात आली. यासाठी त्यांनी NDDF/CC&RF या योजनेमध्ये पायाभूत सुविध स्वखर्चाने उभी केली. यासाठी कंपनीने रु. ६,३८,७००/-इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले व प्रत्यक्ष WCR नुसार रु. ५,७३,८८९/- इतकी रक्कम परताव्यास पात्र ठरली. मंजूरी नुसार १०५ अश्वशक्तीची वीज जोडणी देण्यात आली. तसेच मंजूरी नुसार फेब्रुवारी २०१७ NDDF चा परतावाही बिलातून सुरु झाला. मार्च-२०१८ पर्यन्त परतावा देणे चालू होते. पण यानंतर मुख्य कार्यालय मुंबई यांच्या वर उल्लेख केलेल्या दि. १४.०३.२०१९ या परिपत्रकानुसार बिलातून परतावा देणे थांबवले गेले. याबाबत तक्रारदाराने महावितरण कंपनीच्या कार्यालयास कळविले व परतावा चालू करण्याची विनंती केली. मुख्य कार्यालय, मुंबई यांच्या आदेशाने तात्पुरत्या स्वरुपात बंद केली असलेचे महावितरण कंपनीने तक्रारदारास सांगण्यात आले. याबाबत तक्रारदाराने NDDF योजनेतील मंजूर परतावा रु. ५,७३,८८९/- इतकी असून रु. ८५,०१७/- इतक्या रक्कमेचा बिलातून परतावा मिळालेला आहे, व उर्वरीत रक्कम रु. ४,८८,८७२/- त्यास परतावा चालू करुन मिळावा असे निवेदन केले. यामध्ये दि. २८.०२.२०१८ ते ३१.०३.२०१८ अखेर भरलेल्या बिलांची रक्कम परत मिळावी व पुढील बिलातून ठरलेप्रमाणे ५०% वजावट मिळावी. त्याच प्रमाणे दंड व व्याज लागू नये म्हणून दि. २८.०२.२०१८ नंतर संपूर्ण बिले UNDER PROTEST भरलेचेही नमूद केले. यात NDDF बाबतची वजावट नसल्याचे मंचास सांगितले. यावरुन असे दिसून येते की, NDDF योजनेतील सर्व अटी तक्रारदार व वि. प. महावितरण कंपनी यांना ज्ञात होत्या व मान्यही होत्या. सदर अर्जानुसार कार्यवाही न झालेने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे तक्रार दाखल केली. त्याबाबतचा कक्षाने आदेश दिला परंतु त्यांचे पालन न झालेने व आदेश संदिग्ध असलेने मंचाकडे 'अ' नमुन्यात तक्रार दाखल केली.

यामध्ये (१) फेब्रुवारी २०१८ पासूनची जादा भरलेली रक्कम रु. ८०,१८०/- व्याजासह परत मिळावी तसेच यापुढेही NDDF योजनेचा लाभ मिळावा

(२) NDDF योजना चालू ठेवणार नसाल तर पूर्ण शिल्लक रक्कम रु. ४,८८,८७२/- इतकी व्याजासह एक रक्कमी मिळावी व मानसिक त्रासाबद्दल रु. १०,०००/- भरपाई मिळावी.

अंतर्गत तक्रार निवारण कक्षाच्या आदेशानुसार महावितरण कंपनीने जुलै-२०१९ पासून बिलातून परतावा रक्कम परत देणेचे चालू केले आहे. तथापि एप्रिल २०१८ ते जून २०१९ या कालावधीची बिलाच्या ५०% रक्कमेचा परतावा देण्यात आला नाही. ज्याप्रमाणे मुख्य अभियंता , कोल्हापूर यांची मंजूरी घेऊन NDDF परतावा जुलै-२०१९ पासून चालू केला आहे. त्याप्रमाणे एप्रिल २०१८ ते जून २०१९ याकालावधीच्या परताव्यास मंजूरी घेऊन ती बिलातून अदा करणे शक्य होते. याबाबत वि.प. कंपनीने वरीष्ठ कार्यालयाची परवानगी घेवून परतावा रक्कम बिलातून अदा करण्यात येईल, असे निवेदन केले.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

तक्रारदाराने महावितरण कंपनीचे जे परिपत्रक सादर केले आहे त्या परिपत्रकाचा संबंध NDDF रक्कम परत करणे संदर्भात नसलेने ते लागू होत नाही. त्याच प्रमाणे वि.प. कंपनीने तक्रारदाराच्या मागणीनुसार १०५ अश्वशक्ती इतक्या वीज भारासाठी रोहित्र व केबल ही पायाभूत सुविधा उभी करावी लागली .व त्यानंतर वीज भार कमी करण्यासाठी मागणी करुन तो १९ अश्वशक्ती इतका केला प्रथमच १९ अश्वशक्तीची मागणी केली असती तर रोहित्र उभा करणे पायाभूत सुविधा उभी करावी लागली नसती व जर १०५ अश्वशक्ती मंजूर वीज भार वापरला असता तर ५०% प्रमाणे परताव्याची रक्कमही बिलाच्या माध्यमातून दोन वर्षाच्या कालावधीत परत मिळाली असती, हे म्हणणे योग्य आहे .

ना दुरुस्त मिटर परतावा रक्कम ही तक्रार मंचाकडे अथवा कक्षाकडे सादर केली नव्हती. यामुळे सदर मागणीचा विचार करणे आवश्यक नसलेने हा मंच अशा निष्कर्षास येत आहे कि, तक्रारदाराने मंचापुढे केलेली मागणी अंशत: मान्य करणेत येत आहे.

सदर प्रकरणांत मंचाचे पदाधिकारी बदली होणे , यामुळे तक्रार दोन महिन्याच्या वैधानिक कालावधीत निर्णयाप्रत येऊ शकली नाही.

## आदेश

१) प्रस्तुत तक्रार अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) एप्रिल-२०१८ ते जून-२०१९ या कालावधीतील बंद केलेली परतावा रक्कम रु. ८०,८३०/- ग्राहकाच्या वीज बिलातून एक रक्कमी वजावट करावी .

३) जुलै-२०१९ पासून बिलाच्या ५०% परतावा वजावट चालू केली आहे. ती पुढे मंजूर रक्कम संपेपर्यन्त अखंडीत चालू ठेवावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्लाकॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

19-10-2019 | 19.10.19 | 19.10.2019
---|---|---
(श्री प्रशांत श.पुजारी) | (श्री राजेंद्रल.हजारे) | (श्रीमती पुष्पा सु. तावडे)
ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KO... MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. महावितरण